## फिनोलेक्स पाइप्स आणि गल्फऑइल ल्युब्रिकंट्सचे

# सुरक्षित रस्त्यांसाठी पुणे पोलिसांशी सहकार्य

● पुणे । प्रतिनिधी

नागरिकांमध्ये सुरक्षित रस्त्यांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी फिनोलेक्स पाइप्स आणि गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्सने पुणे पोलिस व ट्रॅफिक पोलिस खात्याच्या सहकार्याने पुण्यात आज रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन केल्याचे जाहीर केले. दोन्ही कंपन्या एकत्र येत पुणे पोलिस अधिकाऱ्यांना १,६०० हेल्मेट्स आणि मास्कचे वितरण करणार आहेत.

यानिमित्ताने १५ जानेवारी २०१७ रोजी ३६ किलोमीटरच्या रस्ता सुरक्षा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली पुणे पोलिस मुख्यालय, शिवाजीनगरपासून सकाळी सात वाजता सुरू होणार आहे. शहराच्या सर्व भागांत जागरूकता निर्माण करण्याच्या हेतूने या रॅलीचा मार्ग आखण्यात आला आहे.

या उपक्रमाबाबत फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या संचालिका रितू छाब्रिया म्हणाल्या की, जबाबदार कॉर्पोरेट नागरिक या नात्याने फिनोलेक्स सुरक्षित रस्ते तयार करण्यासाठी बांधील आहे. हा उपक्रम प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या सुरक्षित रस्त्यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टीबाबत जागरूकता निर्माण करण्याची संधी देईल, असे आम्हाला वाटते. अधिकारी खाती आणि कॉर्पोरेट कंपन्यांनी एकत्रितपणे अशा उपक्रमांचे आयोजन केल्यामुळे जागरूकता निर्माण होण्यास चालना मिळेल व जास्तीत-जास्त लोक संबंधित समस्या सोडवण्यासाठी पुढे येतील असा आम्हाला विश्वास वाटतो. या बाइक रॅलीमध्ये सहभागी होऊन महत्त्वाच्या उपक्रमात भागीदार होण्याचे आवाहन मी लोकांना करतो.

याप्रसंगी पुणे पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला म्हणाल्या, वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे हे थेट आपल्या व आपल्या प्रियजनांच्या सुरक्षेशी, अपघात टाळण्याशी व गाडी तसेच जीवनाचे नुकसान होण्याशी, लोकांसाठी अडथळे निर्माण करण्याशी व आपल्या नागरिकांसमोर चांगले उदाहरण ठेवण्याशी निगडीत असते. वाहतुकीचे नियम अतिशय सोपे असतात आणि त्यांच्या पालनाची सुरुवात आपल्यापासून होते. जर तुम्ही तुमच्या कुटुंबावर प्रेम करत असाल, तर वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याची व वाहन चालवताना शिस्त राखण्याची आम्ही विनंती करतो.